# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. (शिक्षणशास्त्र) या पदवीच्या पूर्ततेसाठी संशोधकाने संशोधन विषयाचा अभ्यास माननीय गुरुवर्य डॉ. के. डी. गायकवाड यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. त्यांचे वेळोवेळी मिळालेले सखोल व सुयोग्य मार्गदर्शन यामुळेच हा शोध-प्रबंध पूर्ण होऊ शकला. संशोधक त्यांचा ऋणी आहे.

या संशोधन कार्यात आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य बी. जे. दळवी सर यांनी प्रेरणा दिली. संशोधन पद्धती व अहवाल लेखनशास्त्र संदर्भातील मार्गदर्शन डॉ. के. डी. गायकवाड यांच्याकडून लाभले. प्रा. बा. आ. चौधरी व प्रा. सी. पी. कदम सर यांनी संख्याशास्त्रीय माहिती सुलभ करुन सांगितली. तसेच कॉलेजचे सर्व प्राध्यापक व कार्यालयीन सेवकवर्ग या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. या सर्वांचा संशोधक अत्यंत ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधन समस्येच्या संदर्भात माहिती उपलब्ध होण्यास कॉलेजचे ग्रंथपाल श्री. गोडसे, सहाय्यक श्री. बाबर यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे महाबळेश्वर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री. केशव महादेव बेलोशे सो, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. एम. के. वाशिवले, तसेच श्री. न. रा. शिंदे, श्री. रा. ना. गोळे, श्री. मोरे या सहशिक्षकांनी संशोधन कार्यात मौल्यवान सहकार्य केले. त्याबद्दल संशोधक या सर्वांचा सदैव ऋणी आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हरोशी, जावलीचे वरिष्ठ मुख्याध्यापक व सर्व अध्यापक-अध्यापिका यांनी संशोधन कार्यात मदत केली. तसेच सौ. सुनंदा आखाडे, कु. अश्विनी आखाडे व सागर आखाडे इत्यादी कुटुंबियांची मोलाची मदत मिळाली. या सर्वांचा संशोधक ऋणी आहे.

या संशोधन अहवालास सुबक व आकर्षक रुप देण्याची जबाबदारी रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, साताराचे श्री.मुकुंद ढवळे व श्री.राजू कुलकर्णी यांनी समर्थपणे पेलली. संशोधक त्यांचाही ऋणी आहे.

सातारा

दिनांक - २८-६-२००४ (राजकुमार पांडुरंग आखाडे)